# नवी मुंबई महानगरपालिका
## महापालिका सर्वसाधारण सभा

महानगरपालिकेच्या **बुधवार, दिनांक १० डिसेंबर २०१४ रोजी** भरलेल्या माहे डिसेंबर महिन्याच्या सर्वसाधारण सभेतील **मंजूर/नामंजूर** इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| **विषय क्र. १.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | इतिवृत्त कायम करणे. |
| **निर्णय -** | **महानगरपालिकेचे दिनांक १८ नोव्हेंबर २०१४ रोजीचे इतिवृत्त कायम करण्यात आले.** |
| **विषय क्र. २.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | प्रश्नोत्तरे. |
| **निर्णय -** | **मंजूर.** |
| **विषय क्र. ३.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पातील तरतुदींचे पुर्नविनियोजन करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक २१/११/२०१४ चे पत्र क्र.नमुंमपा/लेखा/९२१/२०१४. |
| **ठराव क्र. ८९५.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | "सन २०१४-१५ च्या मंजुर अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये उपरोक्त 'अ' मधील अनु. क्र. १ ते ४१ नुसार प्रस्तावित वाढ रु. १९७२७.४० लक्ष व 'ब' मधील अ. क्र. १ ते ४२ नुसार प्रस्तावित घट रु. १९७२७.४० लक्ष असा एकत्रित मूळ मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीवर निरंक परिणामास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम-१०३ नुसार, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर.** |
| **विषय क्र. ४.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांकरिता छापील रजिस्टर्स, फॉर्मस् व पावती पुस्तके छपाई करुन घेणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक ११/११/२०१४ चे पत्र क्र.नमुंमपा/भांडार/३२७५/२०१४. |
| **ठराव क्र. ८९६.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांकरिता छापील रजिस्टर्स, फॉर्मस् व पावती पुस्तके छपाई करुन घेणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. २ कोटी, ६३ लाख, ७० हजार, ९५६ मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात बँकींग सुविधा उपलब्ध होणेकरीता स्टेट बँक ऑफ म्हैसुर शाखा, सी.बी.डी. बेलापूर यांना जागा उपलब्ध करुन देणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक २१/११/२०१४ चे पत्र क्र.नमुंमपा/मालमत्ता/१३३७/२०१४. |
| **ठराव क्र. ८९७.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | "नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात बँकींग सुविधा उपलब्ध होणेकरीता स्टेट बँक ऑफ म्हैसूर, शाखा, सी.बी.डी., बेलापूर यांना प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह तसेच वर नमुद केलेल्या बाजार मुल्य भाडे दराने निविदा न मागविता ५ वर्षाकरीता परवानगी व अनुज्ञा (Leave and Licence) तत्वावर जागा उपलब्ध करुन देण्यास व करारनाम्याच्या अन्य अटी व शर्ती निश्चित करण्याचे अधिकार मा. आयुक्त, यांना प्रदान करण्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ (क) व (ड) नुसार, सुचविल्याप्रमाणे, कार्योत्तर मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर.** |
| **विषय क्र. ६.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात खोदकाम परवानगी देताना आकारावयाच्या शुल्काच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक १४/११/२०१४ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./२६०१/२०१४. |
| **ठराव क्र. ८९८.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात खोदकाम परवानगी देताना प्रस्तावातील बाब क्र. १ ते ४ मध्ये सुधारित प्रस्तावित दरानुसार शुल्क आकारण्यास, सदरचा प्रस्ताव सहा महिन्यानंतर नव्याने सादर करण्यात यावा आणि तुर्तास सदर प्रस्ताव नामंजूर करण्यास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **नामंजूर.** |
| **विषय क्र. ७.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवर लघुलेखक (उच्चश्रेणी) या संवर्गात पद निर्मिती करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक २६/०८/२०१४ चे पत्र क्र.नमुंमपा/प्रशा/आस्था-१/२५८७/२०१४. |
| **ठराव क्र. ८९९.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवर लघुलेखक (उच्चश्रेणी) या पदाकरीता नियुक्तीचे प्रमाणे सरळसेवा ५०% व पदोन्नतीचे ५०% ऐवजी पदोन्नतीचे प्रमाण १००% याप्रमाणे लागू करण्यास, तसेच उपरोक्त प्रस्तावित संवर्गाच्या पदनिर्मितीस, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५१(४) नुसार, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. ८.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | ऐरोली प्रभाग क्र. ११, सेक्टर - ०३ येथे विभाग कार्यालयाच्या बाजूस असलेल्या नवीन समाजमंदीर इमारतीचे वाढीव बांधकाम करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक २५/०८/२०१४ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./२२१६/२०१४. |
| **ठराव क्र. ९००.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | "ऐरोली प्रभाग क्र. ११, सेक्टर-०३ येथे विभाग कार्यालयाच्या बाजूस असलेल्या नवीन समाजमंदीर इमारतीचे वाढीव बांधकाम करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. ४४ लाख, ९२ हजार, १४८ मात्र इतक्या खर्चास, तसेच नियमानुसार भाववाढी पोटी देय असलेल्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर.** |
| **विषय क्र. ९.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | ऐरोली प्र.क्र.१० सेक्टर - ०२ भुखंड क्र. ४१ येथील नागरी आरोग्य केंद्र इमारत तोडून नवीन नागरी आरोग्य केंद्रासह बहुउद्देशिय इमारत बांधण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक २५/०८/२०१४ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./२२१७/२०१४. |
| **ठराव क्र. ९०१.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | "ऐरोली प्रभाग क्र. १०, सेक्टर-०२ भुखंड क्र. ४१ येथील नागरी आरोग्य केंद्र इमारत तोडून नवीन नागरी आरोग्य केंद्रासह बहुउद्देशिय इमारत बांधण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. २ कोटी, १२ लाख, १३ हजार, ९९७ मात्र इतक्या खर्चास, तसेच नियमानुसार भाववाढी पोटी देय असलेल्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर.** |
| **विषय क्र. १०.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | सानपाडा सेक्टर ५ येथील पदपथांची सुधारणा करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक २५/०८/२०१४ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./२२२०/२०१४. |
| **ठराव क्र. ९०२.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | "सानपाडा सेक्टर ५ येथील पदपथांची सुधारणा करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. ५५ लाख, ०७ हजार, ९१७ मात्र इतक्या खर्चास, तसेच नियमानुसार देय असलेल्या भाववाढीपोटी वाढीव रक्कमेस, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. ११.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | वाशी सेक्टर ७ व ८ मधील उर्वरीत रस्त्यांची डांबरीकरणाने सुधारणा करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक २५/०८/२०१४ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./२२२१/२०१४. |
| **ठराव क्र. ९०३.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | "वाशी सेक्टर ७ व ८ मधील उर्वरीत रस्त्यांची डांबरीकरणाने सुधारणा करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. ४० लाख, ३९ हजार, ४२८ मात्र इतक्या खर्चास, तसेच नियमानुसार देय असलेल्या भाववाढीपोटी वाढीव रक्कमेस, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर.** |
| **विषय क्र. १२.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. १८ व १९ सानपाडा येथील शाळेसाठी तिस-या मजल्याचे वाढीव बांधकाम करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक २२/०८/२०१४ चे पत्र क्र.नमुंमपा/अ.श.अ./११७८/२०१४. |
| **ठराव क्र. ९०४.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | "नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. १८ व १९ सानपाडा येथील शाळेसाठी तिस-या मजल्याचे वाढीव बांधकाम करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. २ कोटी, ३२ लाख, ७५ हजार, २८० मात्र इतक्या खर्चास, तसेच नियमानुसार भाववाढी पोटी देय असलेल्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर.** |
| **तां. का. क्र. ४८२.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील (एम.आय.डी.सी. क्षेत्रासह), दैनंदिन कचरा वाहतूकीची कामे, कंत्राटी पध्दतीने करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक ०९/१२/२०१४ चे पत्र क्र.नमुंमपा/घकव्य/७५४/२०१४. |
| **ठराव क्र. ९१५.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | "नवी मुंबई महानगरपालिकेतील कार्यक्षेत्रातील (एम. आय. डी. सी. क्षेत्रासह), दैनंदिन कचरा वाहतूकीची कामे, कंत्राटी पध्दतीने करण्याच्या कंत्राटाचा कालावधी मा. महासभेच्या मंजूर ठराव क्र. १५०८ दि. १८/०९/२०१२ नुसार ०७ वर्षाचा असून निविदेतील अटी/शर्तीनुसार प्रस्तावातील तक्ता ६ मध्ये नमूद केलेल्या बाब क्र. १ ते ३ ची महागाई निर्देशांकानुसार परिगणना मा. आयुक्तांच्या स्तरावर करुन, संबंधितांस वर्षनिहाय कार्यादेश निर्गमित करणे व तत्सबंधिची देयके अदा करणेसाठी तसेच उक्त कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. ५४ कोटी, ७९ लाख, ४४ हजार, ९७१ मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, सुधारित प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर.** |

| | |
|---|---|
| **तां. का. क्र. ४८३.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | मौजे तुर्भे येथील गट नं. ३७६, ३७७ व ३७८ येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी मंजूर विकास योजनेत ३४ एकर क्षेत्र आरक्षीत करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक ०९/१२/२०१४ चे पत्र क्र.नमुंमपा/नरवि/ससंनर/९९३७/२०१४. |
| **<u>ठराव क्र. ९१६.</u>**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | "मौजे तुर्भे येथील गट नं. ३७६, ३७७ व ३७८ येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी मंजूर विकास योजनेत ३४ एकर क्षेत्रासाठी मंजूर विकास योजनेत फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत प्रस्तावातील अ, ब, क, ड येथे नमूद केलेप्रमाणे योग्य ती कार्यवाही करणेसाठी आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांना प्राधिकृत करणेस, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये आवश्यक ती कार्यवाही करणेस, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर.</u>** |
| **तां. का. क्र. ४८४.**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | टि.टि.सी. औद्योगिक क्षेत्रातील महापे येथे आरोग्य केंद्र प्रयोजनासाठीच्या PR-१ या भुखंडास संरक्षक भिंत बांधण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक १०/१२/२०१४ चे पत्र क्र.नमुंमपा/अ.श.अ./१४६४/२०१४. |
| **<u>ठराव क्र. ९१७.</u>**<br>**दि. १० डिसेंबर २०१४** | "टि.टि.सी. औद्योगिक क्षेत्रातील महापे येथे आरोग्य केंद्र प्रयोजनासाठीच्या PR-१ या भुखंडास संरक्षक भिंत बांधण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. २७ लाख, २५ हजार, ७४८ मात्र इतक्या खर्चास, तसेच नियमानुसार भाववाढीपोटी देय असलेल्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर.</u>** |

**<u>महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी मा. आयुक्तांकडे पाठविलेल्या सन्मा. नगरसेवकांच्या ठरावांची यादी</u>**

**माहे डिसेंबर २०१४ ची सभा**

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १. | **श्रीम. शुभांगी ज्ञानेश्वर पाटील, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिसरातील मालमत्ता धारकांना मालमत्ता करांची अवाढव्य अशी बिले येतात त्यामुळे येथील नागरिक बिल भरण्यास टाळाटाळ करतात त्याकरिता सन २०१४-२०१५ मार्च पर्यंत येणा-या बिलामध्ये जे व्याज व दंडव्याज लावण्यात आले आहे ते संपूर्ण माफ करणे. | १३ डिसेंबर | ९०५ १०/१२/२०१४ | मंजूर |
| २. | **सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडूनः-** प्रभाग क्रमांक २१ अंतर्गत मराठी व हिंदी माध्यमाची प्राथमिक व माध्यमिक शाळा बांधणे. | १४ डिसेंबर | ९०६ १०/१२/२०१४ | मंजूर |
| ३. | **सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडूनः-** प्रभाग क्रमांक २१ घणसोली येथील तळवली तलावाचे सुशोभिकरण करुन बसवण्यासाठी आसनव्यवस्था करणे. | १५ डिसेंबर | ९०७ १०/१२/२०१४ | मंजूर |
| ४. | **सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडूनः-** प्रभाग क्रमांक २१ मध्ये महानगरपालिकेची एकही अंगणवाडी शाळा नाही. तरी या परिसरात लवकरात लवकर अंगणवाडी शाळा सुरु करणे. | १६ डिसेंबर | ९०८ १०/१२/२०१४ | मंजूर |
| ५. | **सौ. सुरेखा रविंद्र इथापे, यांजकडून :-** प्रभाग क्र. ८०, नेरुळ, सेक्टर १९ अे येथील नाल्याच्यालगत (बॅरेगट) संरक्षक कठडा बांधणे. | १७ डिसेंबर | ९०९ १०/१२/२०१४ | मंजूर |
| ६. | **सौ. सुरेखा रविंद्र इथापे, यांजकडून :-** प्रभाग क्र. ८०, नेरुळ, सेक्टर १९ अे येथील अंतर्गत सर्व रस्त्यांचे डांबरीकरण करुन सुधारणा करणे. | १८ डिसेंबर | ९१० १०/१२/२०१४ | मंजूर |
| ७. | **सौ. सुरेखा रविंद्र इथापे, यांजकडून :-** प्रभाग क्र. ८०, नेरुळ, सेक्टर १९ अे येथील स्ट्रीट लाईटची फिटींग नव्याने बसविणे. | १९ डिसेंबर | ९११ १०/१२/२०१४ | मंजूर |
| ८. | **सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिका सार्वजनिक रुग्णालय वाशी येथे कर्करोग निदानासाठी आवश्यक असणारी "मेमोग्राफिक यंत्र" (Memographic Machine) व सदर यंत्र नियंत्रीत करण्यासाठी अधिकारी कर्मचारी उपलब्ध करुन देणे. | २० डिसेंबर | ९१२ १०/१२/२०१४ | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ९. | **सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. ८१, आग्रोळी उड्डाणपुल ते आग्रोळी तलावापर्यंत मुख्य रस्त्यांच्या दोन्ही बाजूला पदपथाची निर्मिती करणे. | २१<br>डिसेंबर | ९१३<br>१०/१२/२०१४ | मंजूर |
| १०. | **सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. ८१, आग्रोळी तलावाच्या आवारात कायमस्वरुपी मुतारी व शौचालय बांधणे. | २२<br>डिसेंबर | ९१४<br>१०/१२/२०१४ | मंजूर |